म. ग्रं. सं. ठाणें
[वि]षय काव्य
[क्र]. नं. ३४८
१९३९
१०८३
२८-१०-३९
REFBK-0004515
REFBK-0004515

# हृदय-हारिणी

कवि—स. वि. जोगळेकर.

६१०८
ठाणे

१९३१

८०६
ता. २८-१०-३१
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ४५१५
मुंबई शाखा

मुद्रकः—रा. एस. व्ही. परुळेकर, मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया
सोसायटीज् बिल्डिंग, सँण्डहर्स्ट रोड गिरगांव, मुंबई नं. ४.

प्रकाशकः—एस्. व्ही. जोगळेकर; शांताराम चाळ, मझगांव मुंबई.

ह्रे.काळ्रि८०७

स्वामित्व


# क्षमस्व !

वऱ्हाड प्रांतांतील मोरणा नदीच्या तीरावर गृह-वास्तव्य, पण मुंबापुरींत शास्त्रीय विषयांच्या अभ्यासासाठीं बालाश्रमांत ठेविलेल्या कल्पित लीलावतीला अधिष्ठान करून तिच्या सुगुणसौंदर्यावर लुब्ध झालेल्या कवीनें, तिच्या प्रेमलाभासाठीं लागलेला ध्यास व आकांक्षा यांमध्यें, काढलेल्या आलापांची परिणति विधिलिखिताच्या विषमतेनें त्याला निस्संग संन्यासी बनविण्याला कारणीभूत झाली असें चित्र या ‘ हृदयहारिणी ’ काव्यांत रेखाटण्याचा प्रयत्न केलेला आहे !

पित्याच्या हाताचा आधार धरून लहान बालक ज्याप्रमाणें अडखळत अडखळत पाऊल टाकीत असतें त्याप्रमाणें काव्यसृष्टींत पहिलें पाऊल टाकीत असतांना माझी स्थिति झाली आहे. परंतु रसिकांच्या उदार बुद्धीवर विश्वास ठेवून ‘ क्षमस्व ’ म्हणून काव्यमंदिरांत दोन पावलें टाकण्याचें मीं धाष्टर्य केलें आहे.

माझ्या विनंतीला मान देऊन महाराष्ट्रांतील विद्वद्रत्न माझे मित्र प्रो. श्रीकृष्ण नीळकंठ चापेकर यांनीं या चिमुकल्या काव्याला विद्वत्तापूर्ण व मार्मिक प्रस्तावना लिहून दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी असून ‘ मुंबईवैभव ’ छापखान्याचे चालक श्री. सिधये यांनीं आस्थेनें पुस्तक लवकर व सुबक छापून दिल्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहें.

मुंबई
विजयादशमी.
ता. २०।१०।३१

रसिकांचा कृपाभिलाषी,
**सदाशिव विष्णु जोगळेकर.**

हें

चिमुकलें काव्य ललितकलेची एकनिष्ठपणें व उत्साहानें
सेवा करीत असलेले माझे परम मित्र
प्रो. बी. आर. देवधर, बी. ए. यांस त्यांच्या
प्रेमळपणा व रसिकपणा या सद्गुणांचें
पारितोषिक म्हणून मी सप्रेम
अर्पण करीत आहें.

ग्रंथकर्ता.

४५९५
स्वच्छ प्रत

श्री.

# रसिकावलोकन

( APPRECIATION )

लेखकः—प्रो. श्रीकृष्ण नीलकंठ चापेकर, एम्. ए. एल्. एल्. बी.
डेक्कन कॉलेज, पुणें.

अति रम्य काव्य असतां तेथें दोषांसि शोधितो पिशुन ।
अति रमणीय शरीरीं व्रण शोधी जेंवि मक्षिका टपुन ॥

—'कवि व कविता' ( कै. वामन दाजी ओक. )

जुन्यांतुनिच जें नवें निघत तें मना तोषवी ।

—' पुष्पांजलि ' ( रहाळकर. )

' योगायोग ' ' नेमानेम ' हे शब्द आपण व्यवहारांत कितीदां तरी वापरतों ! परंतु प्रत्येक खेपेला, या शब्दांत भरलेला गंभीर अर्थ आपल्या मनांत स्पष्टपणें उभा राहातोच असें नसून, पुष्कळदां हे शब्द केवळ भाषणाची रूढि म्हणूनच आपण ते योजीत असतों. पण या वैचित्र्य-पूर्ण व्यवहारांत असे कांहीं अकल्पित व आश्चर्यकारक प्रसंग घडून येतात कीं त्यांच्या योगानें मात्र ' योगायोग ' 'नेमानेम' अशा सारख्या शब्दांची गूढ व उग्रतर अर्थपूर्णता आपल्या मनावर विशेष प्रबल-रीतीनें ठसते; आणि ते प्रसंग मनुष्यहानि वगैरे सारख्या दुःखद गोष्टीशीं निगडित असल्यास, मन उत्कट व सखेद विस्मयानें व्याकुल होऊन जातें ! तशाच तऱ्हेचा प्रकार प्रस्तुत " रसिकावलोकन " माझ्या हातून लिहिलें जाण्याच्या योगायोगासंबंधीं झाला आहे ! " हृदय-हारिणी " काव्याचे कर्ते माझे प्रिय कविमित्र रा. रा. सदाशिवराव जोगळेकर यांचा माझा परिचय होण्याचा सुयोग कांहीं काळापूर्वीं अकल्पित-

रीतीनें मुंबईस गेलों असतां अगदीं सहजगत्या जुळून आला! त्यानंतर कांहीं दिवसांनीं त्यांची पुन्हा मुंबईस भेट झाली त्यावेळीं त्यांनीं आपलें प्रस्तुतचें 'हृदय-हारिणी' खंडकाव्य मला छापील मुद्रितांवरून समग्र वाचून दाखविलें, आणि या काव्याला रसिक, काव्यमर्मज्ञ आणि महाराष्ट्रसाहित्यभूषण रा. अच्युतराव कोल्हटकर हे प्रस्तावना लिहीत आहेत असेंही सांगितलें. परंतु या मर्त्य लोकींच्या व्यवहारांत कित्येकदां "मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यच्च चिन्तयेत्" किंवा "न हि प्रतीक्षते मृत्युः कृतमस्य न वा कृतम्' अशासारख्या उक्तींची उग्र सत्यपूर्णता अत्यंत अकल्पित व तीव्राघातरूपानें पटत असते! रा. जोगळेकरांच्या माझ्या भेटीस पंधरातीनवार झाले असतील नसतील तोंच एके दिवशीं, रा. अच्युतरावांच्या अकल्पित व शोचनीय निधनाचें वृत्त वर्तमानपत्रद्वारा विदित झालें! आणि पाठोपाठ रा. जोगळेकर यांचेंही "माझ्या काव्यास आपलेच प्रास्ताविक चार शब्द जोडले जावे असा अखेरीस योगायोग दिसतो" अशा आशयाचें हृदयस्पर्शी पत्र आलें! अर्थात् अशा परिस्थितींत, रा. जोगळेकर यांच्या उत्कट हेतूस मान देणें हेंच ओघप्राप्त मित्रकर्तव्य ठरून तें मी यथाशक्ति व केवळ दिग्दर्शनरूपानें खालील 'रसिकावलोकनांत' बजावीत आहें.

रा. रा. जोगळेकर हे आतांपर्यंत 'कवि' या नात्यानें महाराष्ट्र जनतेस फारसे परिचित नसले तरी, गेल्या वर्षसहा महिन्यांत, "प्रभात" "मौज" व "यशवन्त" यांमध्यें आणि अगदीं अलिकडे (गेल्या ३।४ महिन्यांत) "चित्रमयजगत्"मध्यें प्रसिद्ध झालेल्या, रा. जोगळेकर यांच्या कांहीं कविता, कोठेंही चांगली कविता प्रसिद्ध झाली असतां तिचा आस्वाद घेण्यास सदा तत्पर असणाऱ्या व काव्यक्षेत्राचें नेहमीं बारकाईनें निरीक्षण करणाऱ्या अशा रसिक वाचकांच्या सूक्ष्म अवलोकनांतून सहसा चुकल्या नसतील; आणि त्या कवितांवरून एक उज्ज्वल व मोहक कल्पनाशक्तीचा आणि व्यवस्थित व मधुर नादपूर्ण काव्यरचनेचा कवि काव्यक्षितिजावर चमकावयास लागला आहे असाही त्यांच्या मनांत क्षणभर विचार आल्याशिवाय राहिला नसेल असें वाटतें. आतांपर्यंत जरी मर्यादित

वाचकवर्गाचेंच लक्ष रा. जोगळेकर यांच्या कवितेकडे गेलें असलें तरी त्यांच्या प्रस्तुत ‘ हृदय-हारिणी ’ या अभिनव व खरोखरच हृदय-हारिणी अशा काव्यनिर्मितीनें अल्पावधींतच अखिल महाराष्ट्र जनतेचें लक्ष त्यांच्या कवितेकडे वेधलें जाईल व या रम्य खंडकाव्याच्या आस्वादानें तिच्या मनास निरातिशय आल्हाद व सकौतुक आनंद वाटल्यावांचून राहाणार नाहीं अशी आमची खातरी आहे. इतकेंच नव्हे तर आम्हास असाही भरंवसा वाटतो कीं प्रस्तुत काव्याचे प्रकाशनानें रा. जोगळेकर यांचें नांव आधुनिक प्रमुख कवींच्या मालिकेंत सहजपणें गुंफलें जाईल.

“ हृदयहारिणी ” हें सुप्रसिद्ध ‘ मेघदूत ’ काव्याच्या धर्तीवर मंदाक्रांता वृत्तांत लिहिलेलें एकशें वीस श्लोकांचे खंडकाव्य आहे. मेघदूताप्रमाणेंच कथासूत्राचे अनुरोधानें याही खंडकाव्याचे प्रत्येकीं साठ श्लोकांचे असे दोन भाग स्वाभाविकपणें झाले असून कवीनें पूर्वार्धांतून उत्तरार्धांत केलेला प्रवेश फार रम्य व काव्यमय कौशल्याचा झाला आहे. ( श्लोक ६० व ६१ पहा. ) निरनिराळे प्रसंग व निरनिराळ्या भावना यांना अनुसरून, शार्दूलविक्रीडित, पृथ्वी, मंदाक्रांता इत्यादि वृत्तें योजण्याचा प्रघात संस्कृत व मराठी वाङ्मयांत सर्वसाधारण असला तरी कांहीं विशेष वृत्तांशीं कांहीं सुप्रसिद्ध काव्यांचा संबंध नित्याचा निगडित झालेला आहे. ‘ मंदाक्रांता ’ वृत्त म्हटलें म्हणजे संस्कृत मेघदूत काव्याची आठवण होते; पृथ्वी वृत्त पुढें आलें कीं मोरोपंतांच्या केकावलीचें सहजगत्या स्मरण होतें; शिखरिणी वृत्ताचा विचार मनांत आला कीं ‘ श्री महिम्नस्तोत्र ’ पंडित जगन्नाथ रायांची “ गंगालहरी” वगैरे सारख्या पावनरम्य स्तोत्रांचे श्लोक मनांत स्फुरूं लागतात. भुजंगप्रयात नांव कानीं येतांच श्री समर्थांचे खडखडीत व खणखणीत भाषाशैलीचे पुरुषार्थप्रेरक ‘ मनाचे श्लोक ’ कानांत घुमूं लागतात ! असो.

प्रस्तुत काव्याचें कथासूत्र कवीनेंच आपल्या “ क्षमस्व ” या प्रास्ताविक उद्गारांत दिलें आहे तेव्हां त्याची येथें पुनरुक्ति करण्याचें प्रयोजन नाहीं. या खंडकाव्याचें कथानक अगदीं लहानसेंच व साधें

आहे, तथापि त्यांत सध्यांच्या तरुण पिढींतील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या उदात्त आकांक्षापूर्ण जीवनावर व तीव्रभावनाप्रधान मनोभूमीवर प्रेमबंधन व प्रणयभंग या दोन गोष्टींचे सुष्टदुष्ट संस्कार कसे घडत आहेत त्याचें रम्य व यथार्थ चित्र थोडक्यांत फारच मार्मिकपणें रेखाटलें गेलें आहे, व त्यावरून रा. जोगळेकर यांच्या ठिकाणीं असलेल्या उज्ज्वल व सहजरम्य काव्य प्रतिभेची साक्ष रसिक वाचकांस उत्तमप्रकारें पटण्यासारखी आहे.

मराठी भाषेंत संस्कृत मेघदूताचीं कांहीं कांहीं चांगलीं रूपांतरें व अनुवाद झालेले आहेत. त्या सर्वांत रसिकशिरोमणि कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं साकी वृत्तांत केलेल्या अत्यंत प्रसादयुक्त व रसपूर्ण रूपांतरास सर्वानुमतें अग्रपूजेचा मान देण्यांत येतो तो सर्वथैव योग्यच होय. या खेरीज रा. रा. देवस्थळी, किरात, लेले वगैरे कवींनीं केलेले समश्लोकी व इतर प्रकारचे अनुवादही मराठी काव्यवाचकांस सुपरिचित आहेत. " मेघदूताच्या " धर्तीवर रचलेलीं व नांव घेण्यासारखीं दुसरीं स्वतंत्र मराठी काव्यें म्हटलीं म्हणजे कै. श्रीपाद नारायण मुजुमदार यांचें हंसदूत नांवाचें रम्योज्ज्वल काव्य व माझे सन्मान्य प्रिय कवि मित्र कै. 'अनंततनय' ( द. अ. आपटे ) यांचें 'श्रीशारदादूतिका' हें सुंदर व प्रसादपूर्ण काव्य हीं दोन होत. याशिवाय 'मेघदूतांचें विडंबन पद्धतीनें अनुकरण करणारें असें 'बल्लवदूत' नांवाचें एक मनोरंजक काव्य सुप्रसिद्ध आहे. परंतु मेघदूताचीच छाया प्रामुख्यानें सर्व काव्यभर व्यापून असतांही प्रस्तुतचें 'हृदयहारिणी' हें काव्य वरील सर्वकाव्यांपेक्षां अगदीं भिन्नस्वरूपाचें आहे. तें कसें हें पुढें विस्तारानें दाखविण्यांत येईलच.

एकादें काव्य दुसऱ्या एकाद्या धर्तीचें आहे असें म्हटलें म्हणजे त्या मूळ काव्याच्या केवळ बाह्यांगाचा-वृत्त वगैरेचा किंवा त्यांतील ठळक कल्पनादिकांचा अनुवाद दुसऱ्या काव्यांत होतां कामा नये. तसें झाल्यास तो अनुवाद केवळ अंधानुकरण होय. अनुवाद करणाराचा हेतु जर 'आपलेंही काव्य महाकवीच्या मूळ काव्याच्या तोडीचें उतरलें आहे व तसें तें गणलेंच गेलें पाहिजे' अशा क्षुद्र अहंकारयुक्त

 सं-काव्य ८०८

ईर्ष्येचा असेल तर तसलें अनुकरण हास्यास्पद नाहीं असें कोण म्हणेल ? पण कित्येकदां तर कांहीं कवि ब्रुवांची व क्षुद्रवृत्ति लेखकांची मजल या पलीकडे गेलेली दिसते ! एकाद्या थोर वाङ्मय कृतींतील कल्पना, विचार इत्यादींचा अनुवाद (किंबहुना कित्येकदां मूळचें सर्वच्या सर्वच आपल्या कृतींत शब्दशः) कोणाही चाणाक्ष व बहुश्रुत वाचकांच्या चटकन लक्ष्यांत येईल अशा रीतीनें आपल्या काव्यांत केलेला असून सुद्धां त्या कल्पना व ते विचार आपलेच आहेत असें भासविण्याचा प्रयत्न करणें किंवा डोळे मिटून दूध पिणाऱ्या व स्वभावतःच चोरवृत्ति अंगीं असलेल्या मांजराच्या दुष्ट धूर्ततेचें ऊर्फ शुद्ध मूर्खतेचें अनुकरण करून दुसऱ्याचे कित्येक समर्पक व मोहक शब्द जणूं काय आपणच नवे बनविले वा रूढ केले असा आविर्भाव आणणें इत्यादि गोष्टी म्हणजे त्यांच्या हातचा केवळ मळ असतो. वाङ्मय क्षेत्रांतील अशाच कृतींना वाङ्मयचौर्य असें नांव असून सज्जन लोक असल्या चौर्यास व्यावहारिक चौर्या इतकेंच-किंबहुना त्याहूनही जास्त-निंद्य व तिरस्करणीय गणतात. याची त्यांना जाणीव नसते असें नाहीं. परंतु आतांच सांगितलेल्या दुष्टस्वभावी व अपहारतत्पर मार्जाराप्रमाणें किंवा निर्ढावलेल्या गुन्हेगाराप्रमाणें, ‘पचेल तों पर्यंत पचवून पाहावें असा त्यांचा निर्लज्जपणाचा बाणा दिसतो ! त्यामुळें तर या वाङ्मयचौर्यावर हिडिसपणाचें पुट चढतें.

अंधानुकरण व वाङ्मयचौर्य यांविषयीं हा जो येथें इतक्या विस्तारानें उल्लेख करणें अवश्य वाटलें त्याचें एक विशेष कारण आहे; तें हें कीं, वाङ्मयक्षेत्रांत-आखाड्यांत-शक्य तितक्या लवकर उडी टाकण्याच्या अनिवार मोहामुळें व अल्पवयसुलभ आतुरतेमुळें कित्येक होतकरू कवि व लेखक यांना स्वतःच्या अंगीं असलेल्या उच्च दर्जाच्या विशिष्ट वाङ्मयगुणाची जाणीव होत नाहीं आणि बाह्यतः डोळ्यांस कांहीं भडक व चटकदार व कानाला गोड असें दिसलें तरी त्यांतील अंतस्थ सकसपणा हिणकसपणा पारखण्याइतकी त्यांच्या अंगीं विवेकशक्ति विकसित झालेली नसते. म्हणून कोणत्यातरी दिखाऊ व तात्पुरत्या खऱ्या भासणाऱ्या कृत्रिमतेनें किंवा विक्षिप्त वैचित्र्यानें तात्पुरती

प्रसिद्धि पावलेल्या कवींची भाषाशैली व विचारप्रदर्शन, कर्णकटु व काव्यरसापकर्षक शब्दप्रयोग यांचें अंधानुकरण करण्याच्या घातुक प्रवृत्तीस बळी पडतात व आपल्या स्वतंत्र काव्यप्रतिभेच्या योग्य विकासास कायमचे मुकतात. अशा होतकरू व अप्रबुद्ध तरुण कवींना वेळींच इशारा देणें आम्हांस योग्य वाटतें. असल्या अंधानुकरणासंबंधीं प्रस्तुत काव्यांतही कवीनें सहजगत्या पुढील मार्मिक उद्गार काढिले आहेत. "लीले, लोकीं अनुकरण तें बुद्धिमांद्यप्रतीति"! (ह. हा. श्लोक १४) या उद्गारांवरून खऱ्या वाङ्मयाविष्कारास अत्यंत आवश्यक अशी जी स्वतंत्र विवेचकशक्ति कोणाही कवीच्या अथवा लेखकाच्या अंगीं असावी लागते ती रा. जोगळेकर यांच्या ठिकाणीं जागरूकपणें वसत आहे असें दिसून येतें व ही फार अभिनंदनीय गोष्ट होय.

मेघदूतांतील जे रम्यविशेष आहेत ते प्रस्तुत काव्यांतही अनेक ठिकाणीं पृथक्पणें वाचकांस दृग्गोचर होतीलच. शिवाय कथासूत्राचें करुणोत्कट गांभीर्य, पद्यरचनेचा सहजौघी व मधुरनादपूर्ण, प्रशांत रम्य प्रवाह, समर्पक सुश्लिष्ट शब्दरचना, चमत्कृतिपूर्ण व आल्हादजनक असा अभिनव कल्पनाविष्कार, सुंदर अर्थांतरन्यास इत्यादि बाबतींतही स्वतंत्र वृत्तीचें सादृश्य दिसून येईल. अर्थात् नातू आजोबासारखा दिसतो या विधानानें दोघांचा तोंडवळा वगैरे बाबतींत सादृश्य सूचित होत असलें तरी आजोबांची प्रौढ व रुबाबदार कांति, वर्तनांतील स्वाभाविक गांभीर्य व हुकमत या गोष्टींनीं आजोबा जसे वंद्य व वरिष्ठ ठरतात त्याचप्रमाणें प्रस्तुत काव्य व मेघदूत यांचें अनेक बाबतींत मोहक सादृश्य दिसलें तरी कालिदासाच्या कृतीची उज्ज्वलता व तिचे इतर सौंदर्यगुण अनुपम व अनन्यसाधारण आहेत व ते तसेच राहाणार ही गोष्ट निर्विवाद होय हें मुद्दाम सांगण्याची आवश्यकता नाहीं. मेघदूतांतील रम्यविशेष हें काव्य वाचतांना मार्मिक व रसिक वाचकांस अनेक ठिकाणीं पृथक्पणें काव्याच्या व त्याचप्रमाणें रचनादि एकंदर वातावरणांत दृग्गोचर होऊन त्यांस फार आल्हाद होईलच; पण त्याच्याचबरोबर हेंही त्यांच्या सहज ध्यानांत येईल कीं मेघदूताचे रम्यविशेष ज्या रूपानें प्रस्तुत काव्यांत व्यक्त झाले आहेत, त्यांत रा. जोगळेकर यांची स्वतःची अशी काव्यप्रतिभा

स्वतंत्रपणें चमकत आहे. " प्रस्तुत काव्य मेघदूताच्या धर्तीचें आहे " या आमच्या विधानाचा वास्तविक आशय काय आहे तो आतां वरील विवेचनावरून वाचकांचे ध्यानांत येईल.

मेघदूताप्रमाणें प्रस्तुत काव्याचा विषय विरहजन्य उद्गार हाच असला तरी दोघांच्या प्रत्यक्ष स्वरूपांत पुष्कळच भेद आहे. मेघदूतांतील यक्षाचा विरह आपल्या प्रियपत्नीशीं झाला आहे व तो एका वर्षापुरताच होता आणि त्या वर्षांपैकींही संदेशप्रेषण काळीं फक्त चारच महिने पुरे व्हावयाचे राहिले होते. यक्षाला तो ' विरहगुरु ' असा वाटला तरी त्या शापाचा अवधि निश्चित असल्यामुळें, विरहाचा परिहार पूर्वसिद्ध असल्यासारखाच होता. प्रस्तुत काव्यांतील विरह दंपतीविरहापेक्षां तीव्र अशा प्रणयभंगामुळें किंवा " मूले कुठारः " या न्यायानें प्रणयबंधनाच्या असिद्धीमुळें उद्भवलेला आहे व जरी काव्याच्या शेवटीं कवीला नायिकेच्या प्रत्यक्ष दर्शनाचा व आलिंगनाचा सुखानुभव मिळाला असला आणि जरी कवीच्या स्वाभाविक धार्मिक वृत्तीस अनुसरून त्यानें " आशीर्वादा शिवाहि नमिला " असला आणि प्रत्यक्ष देवसान्निध्यांत योग्य अशा विवेकपूर्ण आत्मसमाधानानें " जीव माझा निमा ( वा ) ला " असे कवीनें उद्गार काढल्यामुळें काव्याची समाप्ति जरी शांतरसांत झाल्यासारखी दिसली तरी वस्तुतः पुढें दांपत्य संबंधाची आशाच नसल्यामुळें त्याच्या तोंडून

" अलख् अलख् करित फिरतों मी वऱ्हाडीं फकीर ।
नित्यानंदीं हृदय भरलें स्वैर वा बेफिकीर " ॥ ( श्लोक १२० )

असे बाह्यतः शांत वृत्तीचे पण समुद्रस्थ वडवाग्नीप्रमाणें कवीच्या अंतःकरणांत सदा पेटलेल्या प्रखर निराशावन्हीच्या धगधगीची तीव्र जाणीव करून देणारे उद्गार सहजगत्या बाहेर पडल्यामुळें प्रस्तुत काव्याचा खरा शेवट चिर कारुण्योत्कट असाच झाला आहे !

स्वतःच्या क्षेमकुशलतेचें वृत्त आपल्या प्रिय पत्नीस कळवावें, हेंच मेघ दूतांतील कथासूत्राचें स्वरूप असल्यामुळें तदनुसार मेघाच्या दूत-

त्वाच्या कल्पनेस तेथें प्राधान्य असणें अगदीं स्वाभाविक आहे; शिवाय हें दूतकृत्य दंपतीसुखाचा समानुभव असणाऱ्या व स्वाभाविकपणें परोपकार तत्पर अशा खुद्द मेघाकडेच बरोबरीच्या नात्यानें मित्रकृत्य म्हणून सोंपविलेलें अशा स्वरूपाचें आहे. आणि अलकानगरीला पोंचण्याचा मार्ग सुचविण्याच्या निमित्तानें निरनिराळ्या स्थळांचें, तेथील निसर्गशोभा किंवा पवित्रमहात्म्य वगैरेचें, खुद्द अलका नगरीचें आणि तेथील स्त्री-पुरुषांच्या विलासविहारांचें वर्णन केलें आहे तेंही रम्योज्ज्वल, यथोचित व काव्यरसोत्कर्षी असेंच आहे. आणि म्हणूनच संदेशकथनाच्या शेवटीं मेघाच्या भावी व निरपेक्ष मित्रकृत्याबद्दल व दूतत्वाबद्दल वाटणाऱ्या उत्कट कृतज्ञतेच्या उमाळ्यानें यक्षाचें अंतःकरण भरून येऊन त्याच्या मुखांतून "मा भूदेवं क्षणमपि च ते विद्युता विप्रयोगः" असे तीव्र, संव्यथायुक्त व आशीर्वादप्राय उद्गार बाहेर पडले आहेत व तेथेंच त्या अपूर्व उज्ज्वल काव्याची जी समाप्ति झाली आहे तीही फारच समर्पक व परिणामरमणीय अशी झाली आहे यांत शंका नाहीं.

प्रस्तुत काव्याचा विषय अगदीं लौकिक तऱ्हेचा व कांहीं अंशीं नायकाच्या आत्मस्थितिवर्णनपर असल्यामुळें येथें दूतकृत्यास जरी दुय्यम दर्जा प्राप्त झालेला दिसला तथापि हें दूतकृत्य ज्याप्रकारें घडवून आणलेलें आहे, तो प्रकार रम्य असून कवीच्या चतुर कल्पकतेचा द्योतक आहे. समुद्र हा नद्यांचा पति होय या सर्वपरिचित कविसंकेतानुसार वऱ्हाडांतील, नायिकेच्या निवासस्थानाची नदी जी 'मोरणा' तीही समुद्राची प्रिय पत्नीच असल्यामुळें त्याच्याजवळ नित्य असली पाहिजे आणि नायिका व 'मोरणा' नदी या दोन्ही एकाच गांवच्या असल्यामुळें त्या दोघींचेंही बालमैत्रिणींचें नातें कवीनें कल्पिलें आहे. नंतर समुद्राचें गौरवपूर्ण व आपल्या स्थितीशीं सदृश असें प्रणयातुरतादर्शक वर्णन करून, समुद्राची प्रियपत्नी आणि नायिकेची सहग्रामवासी व बालमैत्रिण जी मोरणा नदी तिला, सुटींत आपल्या मातापित्याकडे गेलेल्या नायिकेचें कुशल वर्तमान तिला समक्ष भेटून येऊन स्वतःला ज्ञात करण्यासाठीं कवि मोरणेला माहेरीं धाडण्याची समुद्राला विनंति करीत आहे व समुद्रानें ती मान्यही केली. परंतु

इतक्यांत प्रणयातुर जनांच्या चंचलतेनुसार कवीचा बेत फिरतो व मोरणेला धाडण्यापेक्षां आपण स्वतःच तेथवर जाऊन प्रियेला एकवार भेटून-निदान तिचें एकवार दर्शन घेऊन यावें असें त्याचें मन त्याला सांगतें व त्याप्रमाणें तो तेथवर जातो आणि नायिकेच्या गांवांतील शिवालयांत तिची व त्याची अकल्पित भेट होते आणि परस्परांच्या अनुरागबद्धतेची ही त्यांस साक्ष पटते. तथापि प्रत्यक्ष दांपत्यसंबंधाच्या अशक्यतेच्या विचारानें कवीच्या मनांत लागलीच तीव्र निराशाजन्य वैराग्य उत्पन्न होऊन तो तेथून एकदम निघून जातो व फकिरीच्या बेफिरीवृत्तीनें-पण अंतस्थ औदासिन्यानें-व्याप्त असा जगांत एकटा सैरावरा हिंडत राहातो, असें या खंड काव्याचें थोडक्यांत कथा-सूत्र आहे.

मेघदूतांतल्याप्रमाणें येथें मार्गनिवेदनाच्या निमित्तानें निरनिराळ्या स्थलवर्णनाचें प्रयोजन नसलें तरी, " हृदय-हारिणींत" कवीनें आपल्या कथासूत्राच्या ओघानें मुंबईतील समुद्र, चौपाटी, विद्यार्थिनीचें वसतिगृह, नायिकेच्या गांवीं जावयास निघतांना कवीच्या मनाची झालेली शून्य व विलक्षतेची स्थिति वगैरेचें मार्मिक व यथार्थ सौहार्द सूचक अशा प्रासंगिक विनोदाच्या छटांनीं युक्त असें दिग्दर्शन करण्याची संधी भरपूर साधली असून शिवाय सर्व काव्यांत कवीनें स्वतःच्या प्रणयविव्हल व तर्कवितर्क व्याकुल अशा मनाच्या विषण्णतेची उदासरम्य छटा मनोहर रीतीनें पसरवून दिली आहे. त्यामुळें प्रस्तुत काव्याची एकंदर रचना, पद्यशैली, व विषयप्रतिपादन मेघदूतासारख्या जुन्या अभियुक्त पद्धतीची असून त्यांत आधुनिक तरुण जनांच्या जीवितांतील भावनाप्रधान व अद्भुत रम्यताप्रिय ( Romantic ) अशी प्रणयवृत्ति यथातथ्य प्रतिबिंबित झाली असल्यामुळें, या लेखाच्या आरंभीं दिलेल्या दुसऱ्या अवतरणांत ध्वनित केल्याप्रमाणें हें जुन्या नव्या काव्यपद्धतीचें मिश्रण फार मनोहर व रुचिकर झाल्याची प्रतीति कोणाही रसिक वाचकास आल्यावांचून राहाणार नाहीं.

" हृदय-हारिणी " काव्याची भाषाशैली ही साधारणतः सह-जौघी, समर्पक, मधुरनादपूर्ण व सुश्लिष्टशब्दयुक्त अशी साधली असून विचारांचें व कल्पनांचें गांभीर्यही फार हृद्य व परिणामकारक

वठलें आहे. संस्कृत 'मेघदूताचा-किंबहुना कालिदासाच्या एकंदर काव्यरचनेचाच-प्रमुख विशेष जो, श्लोकांच्या शेवटीं सुंदर अर्थांतरन्यासपर अथवा रम्य सुभाषितरूप चरण सहजगत्या येणें, तोही प्रस्तुत काव्यांत चांगल्या रीतीनें उतरलेला दिसतो. याची उदाहरणें खुद्द वाचकांस पदोपदीं आढळतीलच तथापि नमुन्यादाखल येथें कांहींउद्धृत करितोंः—

"योषा नेत्रें पुरुषहृदया चोरुनी दूर नेती" ( श्लो० २ )

यांतील 'नेत्रें' या शब्दानें सूचित होणारा रज्जु वगैरे बाह्य बंधनकारक साधनाचें सहाय्य न घेतां केवळ "नेत्रकटाक्षाच्याच प्रभावानें" हा ध्वनि आणि त्याच ध्वनीचें 'चोरुनी' व 'दूर' या शब्दांनीं होणारें अर्थोद्दीपन खरोखर रम्य असून ही ओळ वाचतांच कित्येक वाचकांस संस्कृत "कादम्बरीं'तील 'पुंडरीकानें' 'महाश्वेतेस' लिहिलेल्या "प्रणयपत्रिके" ची सहजगत्या आठवण झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

"सौंदर्याच्या सहज कलहामाजिंही चारुता हा!" ( श्लो० १० )

"सौंदर्याचा स्तव कधिं कधीं बालिकांना" रुचेना ( श्लो० ११ )

"कधिं कधीं" या शब्दानें सूचित होणाऱ्या उपरोधिक कल्पनेची खोंच फार खुबीदार व चतुर धूर्ततेची द्योतक आहे!

"वस्तूंची हो विशद गुरुता अंतरंगीं शिरून" ( श्लो० १३ )

"लीले, लोकीं अनुकरण तें बुद्धिमांद्यप्रतीति!" ( श्लोक० १४ )

"आशा! आशा! हर! हर! सखे, हेतु होते विनाशा।
आशावाटे मज अवदशा! ती बरी गे निराशा!॥
कांहीं यत्नां परि न करिते! सुस्त! भारी विकारी!
दोघी देती कलहवशाया दुःख नानाप्रकारीं"॥ ( श्लो० ७० )

"जाती दोघी मसणवटिला भांडता भांडतांना"
देवाचें०.........काण बोलेल थोरां?॥ ( श्लो० ७१ )

"साजेनातें रुदन पुरुषा! रोदनें कार्यनाश" ( श्लो० ७४ )

"दिव्य प्रेमा मरण कधिंना येइ कल्पावसानीं" ( ६६ )

"हौसेला बा रसिक हृदया मोल कांहीं न भारी" ( श्लो० ४३ )

"प्रेमापायीं चतुर मनुजा शक्तिचा लाभ झाला" ( श्लो० २४ )

स-काव्य ८०७



सं. काव्य

" निर्द्रव्याला धनिक न कधीं गौरवानें विलोकीं " ( श्लो० १९ )
" त्या सौंदर्या अमित महती सुंदरि ! प्राप्त होते । "
लोकांमाजीं त्यजुनि सखये, गर्व कीं जे रहातें ॥ ( श्लो० ७ )
" मातृप्रेमा जगिं न उपमा धन्यतेचीच सीमा " । ( श्लो. ५७ )
" प्रेमासक्तां विकल करणें मानिनींना पसंत " ( श्लो. ४१ )
" सन्मित्रांचें हृदय जगतीं चीज ती एक और " ( श्लो. ९६ )

एकाद्या सर्व परिचित शब्दांत कांहीं अकल्पित अपूर्वत्व अथवा कल्पनाचमत्कृतिजन्य हृद्य विरोध दाखवून वाचकांना साल्हाद विस्मित करणें हें जें चांगल्या काव्याचें महत्त्वाचें लक्षण त्यांचीं रम्य उदाहरणें श्लोक १२।१३।१४ यांत वाचकांना पहावयास मिळतील. यांपैकीं १२ व्या श्लोकांत नायिकेला ' मीनाक्षी ' असें जें आपण मागें विशेषण योजिलें तें केवळ ' नित्यक्रमानें '–रोजच्या संवयीचा परिणाम किंवा कविसंकेताच्या गतानुगतिकत्वाचाच प्रभाव ! पण असें विशेषण लावण्यांत आपण कसा प्रमाद करीत आहों तें कवीनें पुढें फार खुबीदार बहारीनें दाखविलें आहे ! सारांश एकाद्या शब्दानें मोठा अर्थपूर्ण ध्वनि सूचित करण्याची हातोटी ही प्रस्तुत कवीच्या रचनाशैलीचा एक सहजसिद्ध विशेष दिसतो.

असेंच आणखी एक रम्य उदाहरण ७४ व्या श्लोकाच्या पूर्वार्धांत वाचकांस पाहावयास सांपडेल, तें हें:—" साजेना तें रुदन पुरुषा ! रोदनें कार्य नाश ! । आली ऐशी मम मनिं गडे, कल्पना सावकाश ॥

अशींच कांहीं उदाहरणें येथें देतों:—

" मातें तीनें मग शिकविलें ! हौस दोघी जणींना ॥ ( श्लो. ९२ )
" काढा यावा अनलसपणें सांगुनी सात नांवा " ( श्लो. ९४ )
" कांवा मित्रा चतुरसखया, सागरा काय झालें ? ।
वर्षाकाळीं अवाचित तुला क्रोधवारें निराळें " ( श्लो. ८८ )

यांपैकीं दुसऱ्या चरणांतील ' अवाचित ' ' क्रोधवारें ' व 'निराळें' हे शब्द फारच काव्यरसोत्कट असून त्यांच्या योगानें सूचित होणारें वर्षाकाळाच्या आरंभीं एकदम बदलणाऱ्या व जणुं काय क्रोधावेशानें खवळून जाऊन चोहोंबाजूनें उसळ्या व धडक्या मारणाऱ्या समुद्राचें शब्दचित्र किती बहारदार आहे हें रसिक वाचकांस सांगणें नकोच.

' निराळें ' या साध्या शब्दांत संस्कृतांतील ' किमपि ' या शब्दाचीच रम्य अर्थोत्कटता उतरली आहे असें वाटतें.

उज्ज्वल काव्यप्रतिभा, अभिनव कल्पनाविष्कार आणि सुश्लिष्ट व रम्य ध्वनिपूर्ण शब्दयोजना या गुणांच्या दृष्टीनें १४ वा श्लोक हा सर्व काव्याचा सारसर्वस्वच होय असें मला वाटतें !

" तारायंत्र प्रथम जगतीं गुप्त संक्षिप्त लीले ।
या नेत्रांनीं सुगुणसरिते, शोधुनी स्थापियेलें ! ॥
कर्णांनीं त्यां अनुसरियलें ! ही जगाचीच रीति ।
लीले, लोकीं अनुकरण तें बुद्धिमांद्यप्रतीति " ॥ १४ ॥

तारायंत्र, दूरध्वनिवाहक यंत्र, वगैरे अगदीं आधुनिक व अपूर्व वाटणाऱ्या भौतिक शास्त्रीय शोधांच्या मूळ उत्पत्तीची जी कल्पना कवीनें या श्लोकांत ग्रथित केली आहे ती फारच रम्य व निरंतर आल्हाददायक अशी आहे. विशेषतः अगदीं अल्प आकाराचे ( संक्षिप्त ) असून अत्यंत गुप्त—म्हणजे इतरेजनांस न कळेल अशा रीतीनें व विद्युत्संदेश शीघ्रगतीनें तत्कालभावप्रदर्शनाच्या कामीं निसर्गसिद्ध पटुत्व असणाऱ्या नेत्रांना अलिकडच्या भौतिक शास्त्रीय शोधांच्या आद्य स्थापेनचा किंवा आद्य प्रणेत्याचा मान देणें व त्याच्याच अनुरोधानें कर्णांवर-कानांवर-नेत्रांच्या अनुयायित्वाचा आरोप करणें या दोन्ही कल्पना अत्यंत अभिनव व रम्य आहेत असें कोणीहि निर्मत्सर रसिक सहज कबूल करील. भौतिक शास्त्रीयप्रगति ही खऱ्या काव्यप्रतिभेला केव्हांही मारक होणारी नसून उलट खरी चतुर काव्यप्रतिभा अशा भौतिकशोधांसच काव्यमय रीतीनें कशी आत्मसात् करूं शकते याचें हें एक उज्ज्वल उदाहरण होय. ' गुप्त ' संक्षिप्त' या साभिप्राय शब्दांच्या जोडीनें तर पोस्ट ऑफिस, स्टेशनें वगैरे ठिकाणचें लहानसें तारायंत्र, खिशांतील विजेची बॅटरी, किंवा अत्यंत साधें व लहान आकाराचें ध्वनिश्रावकयंत्र ( Radio ) इत्यादि वस्तु जणुं काय वाचकांच्या डोळयांसमोर प्रत्यक्ष मांडल्याचाच भास होतो !

" प्रेमाचे ते कठिण अवघे पाश तोडावयाला ।
...................................जीव राहे ॥ १६ ॥

यांतील नुसत्या कोमल शब्दौघावरूनच कवीच्या हृदयांतील उत्कट प्रणयविव्हलता व त्याच्या मनाची होत असलेली कालवाकालव व तळमळ ह्यांचें सुंदर व करुणरसपूर्ण चित्र वाचकांच्या मनश्चक्षूंपुढें उभें राहातें. त्यानंतरच्या श्लोकांत कवीनें आत्मनिवेदनपर अथवा रहःसंवादरूपानें आपल्या नायिकेस उद्देशून केलेलें विचारप्रदर्शनही फार गांभीर्ययुक्त व हृदयस्पर्शी आहे.

श्लोक २३ यांत एके प्रसंगीं नायिकेच्या पुस्तकावर कवीची सहजगत्या चोरदृष्टी जाऊन तद्द्वारा तिचें नांव त्याच्या हस्तगत अथवा कंठगत होतें. ही चौर्याची कल्पना रम्य लालित्ययुक्त असून तत्संबंधाचा कवीचा प्रांजल कबूल जबाब हा प्रणयाच्या कोमल छटेस फारच पोषक झालेला आहे.

श्लोक ३४—नायिकेला भेटण्यासाठीं समुद्रावर जावें असा विचार करून कवि तिकडे जावयास निघतो. आपल्या मनांत हा विचार येण्याचें कारण कवीनें पुढीलप्रमाणेंच सहजसुंदर व समर्पक उपमांच्या द्वारें दर्शविलें आहे.

" शोधी जैसा हरि करिपथा त्याचिया पावलांनीं ।
संकेतीं वा चपळ हरिणी पारधी जेंवि रानीं " ॥ ३४ ॥

श्लोक ३७. या श्लोकांतलि, स्त्रियांची स्वाभाविक कनकप्रीति मनांत आणून सूर्यानेंही " पश्चिमेच्या घरातें " जातांना तिला प्रसन्न करण्याकरितांच जणूं काय स्वतःजवळ पुष्कळसा सुवर्णपुंज घेतला ही कल्पना निसर्गवर्णनाच्या दृष्टीनें यथार्थ असून लोकव्यवहारादिग्दर्शन या नात्यानेंही ती सत्यपूर्ण आहे म्हणून हा श्लोक प्रस्तुत काव्यांतील सहजरम्य स्थळांपैकीं एक समजण्यास हरकत नाहीं.

श्लोक ३८ यांत वायूची केलेली निर्भत्सना सात्त्विक आवेशयुक्त व स्त्रीदाक्षिण्यसूचक असून ती वाचतांच शकुंतलेस त्रास देणाऱ्या भृंगाची " कः पौरवे वसुमतीं शासति शासितरि दुर्विनीतानाम् । अयमाचरत्यविनयं मुग्धासु तपस्विकन्यासु ॥ " इत्यादि आवेशानें

निर्भत्सना करीत करीत त्यानिमित्तानें शकुंतला व तिच्या दोन सख्या यांच्या सन्मुख उभे राहाण्याची संधी साधणाऱ्या दुष्यंताची आठवण होते ! अशीं आणखीही कित्येक रम्य स्थळें वाचकांसमोर ठेवतां येतील. परंतु तसें करणें म्हणजे त्यांच्या स्वतंत्र रसास्वादक्षमतेचा उपमर्द केल्यासारखा होईल आणि सगळें नाटक स्वतःच सांगून टाकणाऱ्या सूत्रधाराप्रमाणें अप्रयोजक व हास्यास्पद होईल म्हणून हें रसिकावलोकन जास्त न लांबवितां आणखी एकदोन किरकोळ गोष्टींचा ओझरता उल्लेख करून तें पुरें करितों.

कवीच्या कृतींतील दोष दिग्दर्शन हें समतोल प्रस्तावनेचें एक महत्वाचें अंग समजलें जातें व तें योग्य आहे. तथापि ज्या ठिकाणीं दोषांपेक्षां गुणांचाच अंश विशेष दिसतो अशा काव्यांतील दोषदिग्दर्शनावर भर देणें फारसें समंजसपणाचें किंवा गुणग्राही रसिकतेचें निदर्शक नाहीं. हेंच तत्व प्रस्तावनारंभीं दिलेल्या पहिल्या अवतरणांत कै. वामन दाजी ओकांसारख्या सर्वमान्य काव्यरासिक श्रेष्टानें ग्रथित केलें आहे व प्रस्तुत सुंदर काव्यासंबंधी याच तत्वाचें अनुकरण करणें मला उचित दिसतें. म्हणून या कवीच्या काव्यांतील भाषाशैली संबंधीं मला जे एक दोन ठोकळ दोष दिसतात त्यांचें नुसतें दिग्दर्शन करितों.

कवीनें कित्येकदां कांहीं शब्द अथवा त्यांचीं रूपें,-त्याचा वास्तविक अर्थ वगैरेचा विचार न करितां नुसत्या अनुमानधपक्यानें अथवा केवळ नादलुब्धतेला वश होऊन आपल्या रचनेंत गोविलेलीं दिसतात. याचीं दोन तीन उदाहरणें देतों:—

'ध्याना माजीं सतत तिचिया वृत्ति माझी निमाली' येथें 'निमाली' या शब्दानें कवीला ' मग्न झाली, अथवा तल्लीन झाली असा कांहीं तरी अर्थ विवक्षित असावासा दिसतो. हाच शब्द पुन्हा एकदां काव्याच्या शेवटीं १२० व्या श्लोकांत ' जीव माझा निमाला ' या रूपानें अवतरला आहे. येथें ' निमाला ' या शब्दानें, कवीस ' माझा जीव निवाला, शांतता पावला ' असा कांहीं तरी अर्थ अभिप्रेत दिसतो-परंतु वास्तविक ' निमाला ' याचा अर्थ ' मेला,' ' लय पावला ' असा आहे.

" मोरणा स्तूयमाना " ( श्लोक ४५ )–स्तूयमाना हा शब्द केवळ त्याच्या नादानुकूल व भव्य रूपास्तव योजलेला दिसतो. व्याकरण-दृष्ट्या याचा अर्थ ' जिची स्तुति केली जात आहे " असा होतो. परंतु कवीला येथें ' वंद्य, वंदनीय, स्तुत्यर्ह ' असा अर्थच मुख्यत्वें-करून उद्दिष्ट असावासा दिसतो.

श्लोक ४६ " उल्हासाला तव न मिति त्या ! बा तुला स्वर्गवाणें ! " येथें स्वर्गवाणें–" स्वर्गसुख प्राप्त झाल्यासारखें वाटतें " असें कवीला म्हणावयाचें होतें असें वाटतें. पण एकतर ' स्वर्गवाणें ' हा प्रयोगच अशुद्ध आणि क्रियादर्शक ' वाटतें ' ' होतें ' इत्यादि सारख्या पदाच्या अभावानें पदार्थन्यूनतेचा काव्यदोषही येथें घडला आहे.

" पक्षी तेही किलकिल कसे गाति तें ऐक कानें " । पक्ष्यांची ' किलकिल ' नसते; ' किलबिल ' असते; ' कानें ' ' ऐक ' सांगितलें म्हणून बरें झालें ! नाहींतर जुन्या कमिक पुस्तकांतिल ' डोळ्यांनीं बघतों ध्वनी ' अशा सारखा कोणी अनर्थ करावयाचा !

Collages & Courts यांचे दर्शक म्हणून कवीनें योजिलेल्या ' विद्याधामें ' ' सुनयासदनें ' अशा शब्दांचाही साधारण वाचकांस चटकन् बोध होण्यासारखा नाहीं. याप्रमाणें चुकीचे व रसापकर्षक शब्द प्रस्तुत काव्यांत फारच थोडे आहेत; हें जरी खरें आहे तरी काव्यप्रतिभेचे इतर अनेक उज्ज्वल गुण अंगीं असतां असले किरकोळ शब्ददोष मध्येंच आल्यानें कवीच्या काव्यरसोत्कर्षाची हानि होते. अशासारख्या दोषांचें समर्थन ' एको हि दोषो गुणसन्निपाते० ' या सर्व विश्रुत कालिदासोक्तीनें होणारें नसून "मिठाच्या एका खड्यानें हंडाभर दूधही नासतें " ही म्हणच येथें लागू पडते. अनिष्टापत्तिसूचक म्हणच मनांत बाळगून दोष टाळण्याविषयीं कवीनें नेहमीं दक्षता बाळगावी हेंच उचित होय.

शेवटीं पुन्हां एकदां एका गोष्टीचा विशेष उल्लेख करणें अवश्य दिसतें. ती हीच कीं या विवेचनांत कालिदासाच्या मेघदूताचा जो तुलनात्मक विचार केला आहे तो प्रस्तुत काव्य 'मेघदूता'च्या तोडीचें असें सूचित करण्याच्या औद्धत्यपूर्ण वृत्तीनें मी तर केलेलाच नाहीं. परंतु अली-

कडील दुसऱ्या कित्येक अहंमन्य व ‘ आत्मसंभावित ’ कविब्रुव प्रमाणें प्रस्तुत काव्याच्या कर्त्याच्या मनांत देखील स्वतःच्या काव्याविषयीं आत्मवंचक अभिनिवेशाचा लवलेशही नाहीं हें त्याच्या ‘ क्षमस्व ’ या सदराखालील अत्यंत विनयपूर्ण व प्रांजल उद्गारांवरून वाचकवर्गाच्या ध्यानांत येईलच. ‘ प्रांजल ’ हा शब्द या ठिकाणीं तरी विशेष अर्थद्योतक आहे. कारण सांप्रतकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या कित्येक काव्यग्रंथांत कृत्रिम शालीनतेच्या गोंडस व विरल पांघरुणाखालीं अहंमन्यतेचें व आत्मप्रौढीचें पिशाच ठळकपणें वावरतांना दिसूनच येतें !

यावरून एकाद्या अलीकडील कवीच्या मनांत निरंतर सद्वाचनाच्या अभिरुचीनें जे संस्कार त्याच्याही नकळत आपोआप दृढमूल होतात, तेच त्याच्या स्वतंत्र काव्यप्रतिभेच्या आविष्करणांत सहजरम्य तादात्म्यानें कसे प्रतीत होतात, आणि जुन्या धर्तीची अभियुक्त काव्यरचना मनांत चांगली मुरली असेल किंवा त्या पद्धतीचें ग्रहण करण्याची पात्रता अलीकडील एकाद्या कवीच्या अंगीं स्वभावसिद्ध असेल, तर आधुनिक काळच्या परिस्थितींतील प्रणयबंधनादि विषय घेऊन ही जुन्या अभियुक्त पद्धतीनें तो त्यास कशा रम्य रीतीनें व खऱ्या काव्यरसोत्कर्षानें रंगवितां येतो. या दोनच गोष्टी प्रस्तुत रसिकावलोकनांत माझ्या हातून वाचकवर्गापुढें विशदरीतीनें मांडिल्या गेल्या असतील, तर माझे कवि मित्र रा. जोगळेकर यांच्या प्रेमळ अत्याग्रहामुळें लिहिलेल्या या ‘ रसिकावलोकना’चें पूर्ण सार्थक झालें असें मी समजेन.

शेवटीं रा. जोगळेकर यांचे हातून आणखीही अनेक उज्ज्वल काव्यकृति निर्माण होवोत व गुणग्राही वाचकवर्गाकडून त्यांचें योग्य चीज होत राहो अशी अंतःकरणपूर्वक इच्छा व्यक्त करून मी हें रसिकावलोकन नेहमींच्या व्रतानुसार, ‘ श्रीज्ञानेश्वरां’च्या ‘ पसाय-दाना’च्या मंगलकारक अनुवादानें पुरें करितों.

॥ दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्यें पाहो ।
जो जें वांछी तो तें लाहो । प्राणिजात ॥

—श्रीज्ञानेश्वर.

स्थळप्रत



# हृदय-हारिणी.

### वृत्त-मंदाक्रान्ता.

१

त्वन्मूर्तीला, नयनसुभगे, आज या पाहुनीयां ।
चित्त भ्रांति-भ्रमित बनलें; वेदनांना सहाया ॥
मातें बाले, लवहि बल ना! देह येई न भाना ।
हृद्रोगाला अदय तव ही मुग्धता दृश्यमाना ॥

२

हांसे, डोले, मधुर लतिका मंद-वायु-प्रवाहें ।
त्याच्या ठायीं परिमल मना मोहुनी गुप्त राहे ॥
गंभीरा त्वद्गमनगति ही मोहिते चित्तवृत्ति ।
योषा नेत्रें पुरुषहृदया चोरुनी दूर नेती ॥

३

मीनाक्षि! त्वां हृदय हरिलें दर्शनाच्याचि योगें ।
प्रेमोद्गारांस्तव तव मला सारखा ध्यास लागे ॥
मेघासाठीं सतत झुरणें चातकानें निजांगें ।
मद्रोगाला तुजविण दुजा कोण धन्वन्तरी गे? ॥

४

केश प्राया कुटिल कुरळे ! रम्य वेणी विशाला ।
तेथें चित्तें सहज रमणें ! या भुजंगाकृतीला ॥
भ्यावें तेणें म्हणुनि धरिते भाव गे हा तथापि ।
चित्तींचा हा विजय मिळवी पंचबाण प्रतापी ॥

५

वेणीमाजीं तव बसुनियां कुंदपुष्पावली ही ।
हांसे, मोदें हळुच वदते, ‘ जाहलें धन्य कांहीं ’॥
चातुर्यानें तुज विनविलें कीं ‘ शिरीं ठाव द्यावा ’।
वेणीला या अभिनव तिचा ना तरी काय केवा ? ॥

६

पाहोनीयां, शशिमुखि, तुला ‘ पूर्णिमा काय आज ’।
ऐसें वाटे, मुख धुवुनियां पातला चंद्रराज ॥
शब्दांमाजीं सहज भरले ते सुधेचे तुषार ।
सेवोनीयां, क्षणभरि सखे, तृप्त हो ऐकणार ॥

७

वाटे लीलावति ! गुणवती तूं वनींची कुरंगी ।
लावण्याचें अनुपम जगीं स्थान तूंची शुभांगी ॥
त्या सौंदर्या अमित महती, सुंदरि, प्राप्त होते ।
लोकांमाजीं त्यजुनि सखये, गर्व कीं जें रहातें ॥

८

देवेंद्राच्या उपवनलतामण्डपीं वाढलेलें ।
रक्तत्वानें नव विखुरलें, जें गुलाबींच हाले ॥
एके रात्रीं हळुच विधिनें फूल तें चोरियेलें ।
तेणें लोकीं मग समजलें, ओंठ हे लाल झाले ॥

९

येथें कां गे रुसुनि बसली आज चांफेकळी ही ।
जाऊं, तीतें, चल समजवूं, गोड बोलोनि कांहीं ॥

[library stamp]

नेलें तीचें सरळपण कीं नासिकानें तुझ्या या ।
बाळ, त्याचा कुटिल विधिला दोष ! नाहींच अन्या ॥

१०

रम्या शोभा कुमुदवदनें, इंदुहास्यें धरावी ।
किंवा लीलावति, तव मुखीं ती सदाही वसावी ॥
आतां बाला-सुमुखि कलहा तीच शोभा न लावो ।
सौंदर्याच्या सहज कलहामाजिंही चारुता हो ॥

११

केव्हां पीत-प्रतनु-वसनें, शुभ्रवस्त्रें कधीं ये ।
चारुत्वाला द्विगुण पदवी तूझिया, माननीये ॥
रोषा आणीं नच, परिसुनी कल्पनापूर्ण गाना ।
सौंदर्याचा स्तव कधिकधीं बालिकांना रुचेना ॥

१२

त्वन्नेत्रांना प्रथम तुळिलें म्यांचि मीनोपमेनें ।
आतां वाटे खचित चुकलों तेंहि नित्यक्रमानें ॥
लीले, ऐकें, चपल तरुणीनेत्र मोठे विशाल ।
केव्हां केव्हां झणिं पसरिती तेचि गे मोहजाल ॥

१३

कोठें साधे सरळ सगळे मीन भोळे खुळे ते ।
कोठें ज्ञानी चतुर ललनानेत्र चित्ता हरीते ॥
त्या दोघांची लव न समता, ते गुणें भिन्न भिन्न ।
वस्तूंची हो विशद गुरुता अंतरंगीं शिरून ॥

१४

तारायंत्र प्रथम जगतीं गुप्त संक्षिप्त, लीले ।
या नेत्रांनीं सुगुण-सरिते, शोधुनी स्थापियेलें ॥
कर्णांनीं त्यां अनुसरियलें ! ही जगाचीच रीति ।
लीले, लोकीं अनुकरण तें बुद्धिमांद्यप्रतीति ॥

१५

वाढे जैसी नव शशिकला शुक्लपक्षीं पहाया ।
तूंही तैसी दिससि मजसीं वाढती प्रेक्षणीया ॥
आशंकेतें त्यजुनि म्हणुनी सद्गुणांच्या निधाना ।
तूतें ठेवीं नव ‘ शशिकला ’ याचि नामाभिधाना ॥

१६

प्रेमाचे ते कठिण अवघे पाश तोडावयाला ।
त्यांमाजीं मी सखि, गवसलों ! ठाव देई जिवाला ॥
उत्कंठेचा प्रखरतमसा ताप आत्मा न साहे ।
दे हाता या ! मधुरतम गे मीलनीं जीव राहे ॥

१७

सर्वस्वातें तुजसि, सखये, अर्पिलें आज पाहीं ।
भूलोकीं या तुजविण मला आणखी कोणि नाहीं ॥
तूं प्रेमाची हृदय-रमणी ! स्वामिनी तूं जिवाची, ।
सर्वस्वाची ! प्रभुचि तुजला साक्ष देईल याची ॥

१८

स्पष्टोक्तीला परिस, न धरीं मानसीं भीड कांहीं ।
प्रम प्रेमा, हृदय हृदया, जाणतें एक देहीं ॥
तूतें केव्हां तरि, शशिकले, आपलीशी करीन ।
आकांक्षेला पुरवुनि जगीं धन्यता मेळवीन ॥

१९

शास्त्राभ्यासी सधनतनया शोभसी तूं सुशीला ।
लक्ष्मी नोहे मजसि वश गे, मोहिनी ती विलोला ॥
चातुर्याची खनि खचित तूं, जाणसी सर्व लोकीं ।
निर्द्रव्याला धनिक न कधीं गौरवानें विलोकी ॥

२०

धीराधारें प्रबल परि हें साहसी प्रेम मोठें ।
नैर्धन्याची तिळभरि तया भीति कांहीं न वाटे ॥

आनंदानें खडतर पथा आक्रमी, तोंचि त्यातें ।
अंतीं लाभे जणुं सफलता; सारथी दैव होतें ॥

२१

तो माझा गे पणचि अवघा एक भूमंडळीं या ।
साधाया त्या सकलहि बला अर्पिलें एक कार्या ॥
चिंता नाहीं लवहि कसली ! साहसाचा विपाक ।
भोगायाला सबल; सुख वा दुःख हा नाहिं धाक ॥

२२

प्रेमें नेल्या सकल मम या चित्तवृत्ती हिरोन ।
प्रेमासाठीं त्रिभुवन मला वाटतें तेंहि सान ॥
ही प्रेमाची खचित जगतीं मानिली उच्च कोटि ।
साक्षी तीतें सुजन सगळे देव तेतीस कोटि ॥

२३

'सन्मित्राची रुचिर पदवी या जगीं शक्य नाहीं' ।
कार्लाईल प्रकट वदला तें गमे सत्य कांहीं ॥
निःशंकत्वें नियम जगतीं सर्वही सापवाद ।
दिव्य प्रेमीं हृदयरमणी ! नाहिं कांहींच वाद ॥

२४

स्वर्लोकींच्या सुर-मुनि-जनां पूज्य भागीरथीला ।
दीर्घोद्योगें भगिरथ नृपें आणिलें या महीला ॥
उद्योगाची सतत समजें प्रेरणा प्रेमसूला ।
प्रेमापायीं चतुर मनुजा शक्तिचा लाभ झाला ॥

२५

त्वल्लाभानें विनयविनते ! मी जगीं धीरवीर ।
संन्यासी मी तुजविण, सखे, कीं, जगींचा फकीर ॥
त्यातें व्हावें अचलचल हें सारखें वस्तुजात ।
तुच्छ प्रायां ! तुजसि, वद, ये काय शंका मनांत ? ॥

२६

बंधु प्रेमी जनकजननी ठेविलीं दूर कां गे ?।
उद्देशातें कवण धरिलें राहुनी येथ सांगें ॥
शास्त्राभ्यास प्रथित गमतो नीरस प्रायशा तो।
साजेसा तो खचित कधिंही अंगनांना न होतो ॥

२७

बाळे, माझें मन रमतसे कल्पनेच्या तडागीं।
त्याच्या राहे सतत सहसा स्वैर संचार अंगीं ॥
आप्तेष्टांचा विसर पुढतीं दुःखदायी न व्हाया।
भासे मातें, संवय करिसी एकली राहुनीयां ॥

२८

येसी माडीवरुनि, सखये, खालतीं ज्ञानगेहा।
घेवोनीयां मृदु निज करीं पुस्तकांच्या समूहा ॥
वाटे मातें खचितचि तुझें रूप गे मोहिनीचें।
चित्ता मोही ! घडिभरि तुझ्या पावलीं जीव नाचे ॥

२९

हें वास्तव्य प्रकट गमतें मैत्रिणींच्या निनादें।
माधुर्याचें सदन ! चपला-हास्य-लीला-विनोदें ॥
प्रेमी बाला चपलचपला ! नांव द्यावें कशाला ?।
त्यांमाजीं तूं उचित गमसी मोहिनीच्या पदाला ॥

३०

उल्हासानें भ्रमर शिरला अंबुजामाजिं, लीले,।
तेथें त्याच्या कमल-मधुनें देहभानासि नेलें ॥
आतां याचा वद तरि, सखे, दोष द्यावा कुणाला ?।
निर्दोषी तो ! भ्रमरसदृशप्रीति मी सांब भोळा

३१

मुग्धा बाला चपल ! मजला ध्यास लावोनि गेली।
ध्यानामाजीं सतत तिचिया वृत्ति माझी निमाली ॥

कोणाची ही सुमति दुहिता ? कोण ? कोठील ? कोठें ।
गेली? आतां प्रथम बघणें कार्य हें आजि मोठें ॥

३२

सर्वांमाजीं अरसिक दिसे कोण ती वृद्ध आजी? ।
माझ्या चित्ता सहजसहजीं देतसे भीतिला जी ॥
भेटायाला हर ! हर ! न हो धीर बोलावयाला ।
पृच्छा मोठी ! " कुठुनि ? कुठला ? कोण ? आला कशाला ?"

३३

विद्याधामामधुनि सदना एकदा नीट येतां ।
लीले, माझ्या नयनयुगुलें,–सांगतों सत्य आतां ॥
चोरी केली सहज करिंच्या पुस्तकांतूनि कांहीं ।
तेणें मातें मग समजलें स्पष्ट लीलावती ही ॥

३४

शोधी जैसा हरि करिपथा त्याचिया पावलांनीं ।
संकेतीं वा चपल हरिणी पारधी जेविं रानीं ॥
जासी जेथें मुदित हृदयें सागरा पुण्यतीरा ।
भेटायाच्या त्वरित धरिलें अंतरीं मी विचारा ॥

३५

मुंबा देवी चतुर पुरवी कोड तें कौतुकानें ।
ऐकोनीयां तरुणतरुणीप्रेमसंवाद कानें ॥
जेथें नांदे अभिनव मनोहारि सौंदर्य साचें ।
अर्पी त्यांना सहल करण्या तीर तें सागराचें ॥

३६

इष्ट स्थानीं सहज बसलों कल्पनांच्या तरंगीं ।
पोहे माझें चपल चरणीं चित्त हें प्रेमरंगीं ।
छंदांमाजीं मधुनि मधुनी होउनी तेंचि जागें ॥
वाहे तूतें ! गुणगुण करी " ये सखे येथ ये गे " ॥

३७

गेला भानु क्रमुनि पथ तो पश्चिमेच्या घरातें ।
जातांना ने कनक बहु जें पत्निला तोषवी तें ॥
गेला आतां, रवि ! परि मला भान नाहींच साचें ।
'येसी केव्हां'! म्हणुनि हृदयीं कार्य गे चिंतनाचें ॥

३८

पंचाब्धींचें वसन, रसिके, नेसली सृष्टिबाला ।
चेष्टांनीं हा पवन कसला त्रासवी तन्मनाला ॥
येती लाटा ! झुळु झुळु पहा वस्त्र हाले स्वभावें ।
कांहीं संभावितपण तुला का छचोरा न ठावें ?॥

३९

पाहें, आतां, जलधि, सखये, हा उतावीळ झाला ।
येती कैशा अमित लहरी त्याचिया अंतराला ॥
भेटायाला हृदय उडतें ! मोरणेला स्मरोनी ।
मित्रा, राहें सतत जगतीं, भव्य आशा धरोनी ॥

४०

मित्रा, माझें तव हृदयिंचें दुःख आतां समान ।
एकामेकां कथन करणें अंतरींचीच खूण ॥
येथें कोणी कुटिल नच रे! कोणि ऐके न कानीं ।
दुःखांनाही सुसह करणें या समानांतरांनीं ॥

४१

माझी लीला प्रिय सहचरी सागरा, मोरणेची ।
माहेरीं त्या सतत पडते गांठ दोघी जणींची ॥
येथें राहे, परि न मज दे भेट मुंबापुरींत ।
प्रेमासक्तां विकल करणें मानिनींना पसंत ॥

४२

मित्रा, येते, परिस, सखया, एक शंका मना या ।
तणें लीला जणु विसरली आज तीरास याया ॥

संगीताची नव रसिक ती ! हौस चित्तांत बाळे ।
जाते केव्हां मधुनिमधुनी शास्त्रसंगीतशाळे ॥

४३

कौशल्यानें बहु दिलरुवा ती गड्या वाजवीते ।
'सा रे सा रे ग म प ध प नी–' वादनीं दंग होते ॥
मातें येते लहर सहजीं घ्यावयाची लकेरी ।
हौसेला बा रसिक हृदया मोल कांहीं न भारी ॥

४४

जातां लीला मग निज गृहीं भेट होईल साची ।
त्वद्भार्येची, शिशुपणिचिया त्या तिच्या मैत्रिणीची ॥
ऐकायाला सुरस सखया ! चारु संवाद त्यांचा ।
त्वद्भार्येला, तव सुकुशल क्षेम सांगावयाचा ॥

४५

मित्रा, लीला मधुरहृदया मोरणा स्तूयमाना ।
त्यांची मैत्री अचल सुरसा ! बुद्धिमत्ता समाना ॥
त्यांचा जातां सुखनिरत तो काळ तेथेंचि कांहीं ।
वीणा भार्या तवहि बहुधा ती शिकेल स्वगेहीं ॥

४६

मातेचा वा प्रिय भगिनिचा घेउनीयां निरोप ।
येतां मुंबापुरिस चतुरा मोरणा प्रेमरूप ॥
उल्हासाला तव न मिति त्या ! बा तुला स्वर्गवाणें ।
उत्कंठेच्या मधुरतम त्या मोरणेच्या मिठीनें ॥

४७

गोष्टी हातां गुलुगुलु तुझी होत ही शुभ्र काया ।
प्रेमानंदें जवळि बसली मोरणा वाजवाया ॥
तूंही घेसी मग हळुहळू एक गानीं लकेरी ।
माझें येणें तुजसि मग तें रंगभंगप्रकारी ॥

४८
लीलानामीं हृदय रमलें आवडे तेंचि नाम ।
लीले, मातें सकल जगतीं तूंचि आरामधाम ॥
आतां केला झणिं दिलरुबा या दिलाचा, सुशीले, ।
गातां त्याच्या वरि तव गुणां प्राण तल्लीन झाले ॥

४९
‘ येतों आतां ’ म्हणुनि उठलों, सागरा, रात्र झाली ।
आशा झाली विफल, चतुरा, आज लीला न आली ॥
मन्दाक्रान्ता स्मरुनि हृदयीं पावलें मंद मंद ।
मागी टाकीं धरुनि बरवा एक तीचाच छंद ॥

५०
चित्तीं रात्रंदिवस सगळा ध्यास लीलावतीचा ।
भेटायाचा वचन मधु वा एक बोलावयाचा ॥
प्रायां आतां सकळ फसला हा मनींचा विचार ।
पाण्यावीणें तळमळ कशी मीन तो सोसणार ? ॥

५१
विद्याधाम सुनयसदनें बंद झालीं कशाला ? ।
गेहीं कां ही, मुदित हृदयें चालली आज लीला ? ॥
आनंदाचा निधिच जणुं हा ! हा ! वसंतर्तु आला ।
आलिंगाया त्वरित नटली ही पहा सृष्टिबाला ॥

५२
लीले, ऐकें सुगुणसरिते ! एकदा मंदवारीं ।
आनंदानें रवि करि घरीं जावयाची तयारी ॥
येवोनी त्या समज घटिका जाहल्या पंचवीस ।
जाया धामा समय सुचला ! तोचि लीलावतीस ॥

५३
वर्षामाजीं सुरस गमतो एक वैशाख मास ।
विश्रामा दे रुचिर थकल्या श्रांत झाल्या जिवास ॥

माधुर्याची सहज पदवी त्या वसंतागमाला।
कन्या भेटे सदनिं म्हणुनी बंधुमातापित्याला॥

५४

वैशाखाचा दिन परि मला वर्षवर्षाप्रमाणें।
वाटे! सारें तुजविण जगीं शुष्क कंटाळवाणें॥
आलें जें जें निकट सुजनीं पाहिजे तेंचि केलें।
आनंदानें स्मरुनि हृदयीं एक कर्तव्य, लीले॥

५५

पंच प्राणां तुजसह सखे आज देतों मदीया।
ते सांगातीं तुजसि! सखिला रक्षितील स्वकीया॥
सांभाळीं! ये लवकरि! जपें गे जिवाला तुझ्या! जा।
माते तेंवी कळविं जनका हा नमस्कार माजा॥

५६

ग्रामीं जातां कथिं सुमतिला मोरणेला नवाशा।
कीं ऐकाव्या पतिसुहृद ज्या गोष्टि सांगे जराशा॥
लीले, लज्जाललित हृदयीं हौस मुग्धांगनांना।
प्राणेशाच्या सुहृद करि त्या वर्णना ऐकतांना॥

५७

मातेसंगें हळुहळु, गडे, बोल गुह्यासि कांहीं।
तें प्रेमाच, सुगुणसरिते! निर्मल स्थान गेहीं॥
मातृप्रमा जगिं न उपमा! धन्यतेचीच सीमा!
वानाया त्या मति न कविला! घेइ तेथें विरामा॥

५८

बालांसंगें विहर, करिं या स्वैर गेहीं विहार।
अभ्यासाचा परिहर, सखे, शीण तो दुर्निवार॥
विद्यादानक्रम तव कसा चालला सांग ताता।
तेणें त्याच्या, खचित समजें, तोष वाटेल चित्ता॥

५९

त्वन्मूर्तीला त्यजुनि कधिं ना नेत्र अन्यत्र जावा ।
ऐकावें या श्रवणयुगुलें त्या तुझ्या एक नांवा !
चित्तानें या नच तुजविणें छंद कांहीं धरावा ।
त्वत्प्रेमाचा विमल हृदया एक व्हावा विसावा ॥

६०

सन्मानाया तुजसिं सखये ! गुंफितों पुष्पमाला ।
ओंवायाला हृदयघटिं हे प्रेमबिंदू तियेला ॥
पुष्पें ठेवीं जपुनि सगळीं मोजुनी आज साठ ।
गातां लीले, रमणहृदया तोषवी प्रेमपाठ ॥

---

त्वत्सन्मानप्रभवकवनें चित्त माझें न धालें ।
सेवायाला कवन सुरसा आणखी तें भुकेलें ॥
दीर्घत्वाची प्रथम मजला दे क्षमा सन्मनानें ।
मद्रोगाचीं तुजसि कथितों सर्व आतां निदानें ॥

६२

कर्णीं माझ्या जणुं बधिरता पातली मूर्तिमंत ।
ऐके कांहीं इतर नच गे, एक हें प्रेमगीत ॥
नेत्रांमाजीं बहु शिथिलता, प्रेक्षणीं तीच रीति ।
त्वन्मूर्तीच्या सुभग विषयीं आदरें लीन होती ॥

६३

लीले, नाहीं लवहि कसली भूक ! नाहीं तहान !
अन्नामाजीं रुचि न अगदी ! रात्र निद्रा-विहीन ॥
भ्याले सारे सुहृद, वदती, "लागला रोग थोर ।
आलस्यानें परि न करिसी औषधाचा विचार ॥"

६४

चित्तामाजीं निशिदिनिं तुझा लागला ध्यास एक ।
निद्रेमाजीं स्मरण तव गे ! स्वप्न नाहीं अणीक ॥

त्वन्मूर्ती ती वसत रुधिरीं रोमरोमींहि जाण ।
सत्य ब्रह्में स्थिर चर जसें व्यापिलें नित्य पूर्ण ॥

६५

लोकां सांगें कुशल जरि मी, बोलणें तें न साचें ।
सांगूं कोणा वद तरि कसें दुःख माझ्या मनींचें ।
या दुःखाला तुजविण मला कोणता मार्ग सांगें ।
लीले, सारा तव भरंवसा ! तूंचि धन्वन्तरी गे ॥

६६

चित्ता माझ्या शमविं, सखये, देइं आश्वासनाला ।
तेणें कष्टें क्रमिन सखये याहि गंभीर काला ॥
आशातंतु प्रबळ जगवी या जगीं जीवयोनि ।
दिव्य प्रेमा मरण कधिं ना येइ कल्पावसानीं ॥

६७

लीले, सारें जगत खुललें, हांसतें कौतुकानें ।
पक्षी, तेही किलकिल कसे गाति, तें ऐक कानें ॥
मातें झाला सतत परि तो दुःखदायी वसंत ।
प्रेमासाठीं झुरत तव मी जाण मुंबापुरींत ॥

६८

ईशप्राप्तिस्तव करि तपा निश्चयें शैलबाला ।
योगा प्रेरी ध्रुवपद सुखप्राप्ति वांछा ध्रुवाला ॥
त्वत्प्राप्तीचा धरुनि बरवा एक निर्धार चित्तीं ।
त्याची मातें उचित बघणें प्राप्त आहे प्रतीति ॥

६९

झालें आतां पळ घडिपरी, वर्ष मोजीं दिनाला ।
विद्याधामें मग उघडती, आणिती बाल-बाला ॥
आशा चित्तीं सबळ धरुनी, कंठितों प्राप्त काला ।
आषाढाच्या प्रथम दिवसीं योसि मुंबापुरीला ॥

७०

आशा ! आशा ! हर ! हर ! सखे ! हेतु होते विनाशा ।
आशा वाटे मज अवदशा ! ती बरी गे निराशा ॥
कांहीं यत्नां परि न करिते ! सुस्त ! भारी विकारी ।
दोघी देती कलहवश या दुःख नाना प्रकारीं ॥

७१

जाती दोघी मसणवटिला भांडतां भांडतांना ।
तेव्हां होई खचित मग या सौख्य साऱ्या जनांना ॥
तेंही नोहे ! अमर पद त्यां ! हाय ! अन्याय सारा ! ।
देवाचें हें कुटिलपण, गे ! कोण बोलेल थोरां ? ॥

७२

आषाढाचा प्रथम दिन गे, वाट पाहोनि, सारा ।
कंठीं मीही कथमपि सखे ! पार नाहीं विचारां ॥
निद्रा ये ना; तळमळ जिवा सारखी, क्लेशदायी ।
आशाभंग प्रकट गमला ! अग्नि हा देह दाही ॥

७३

आतां कांहीं मुळिं न समजे ! घाबरा जीव झाला ।
मागें आला पति न सतिचा यावयाच्या दिनाला ! ॥
'लीला' ! 'लीला' ! सतत जप हा ! कां न ये आज लीला?' ।
वेडा झाला ! रुदन करि हा जीव भांबावलेला ॥

७४

साजेना तें रुदन पुरुषा ! रोदनें कार्यनाश ।
आली ऐशी मम मनिं गडे कल्पना सावकाश ॥
नाना शंका उठुनि करिती एक कल्लोळ चित्तीं ।
त्यांतें कैसें तरि शमविणें ! सांत्वना तीच रीति ॥

७५

किंवा वाटे, ‘ अनुचित असें बोललों काय साचें ? ।
प्रेमालापीं नियम चुकलों काय संभावितांचे ॥
तेणें आतां, मज गमतसे, मानसीं क्रोध आला ।
ना येसी तूं म्हणुनि, सखये, आजि मुंबापुरीला ’ ॥

७६

लीले, कां गे रुसलिस सखे, काय अन्याय झाला ? ।
सांगें मातें, सुगुणसरिते, खिन्न झाल्या मनाला ॥
ऐशा काळा मजवरि तुवां योग्य नोहे रुसावें ।
अज्ञानें मी सहज चुकलों ! दे क्षमा प्रेमभावें ॥

७७

किंवा वाटे जनक सुचवी शिक्षणाच्या क्रमाला ।
तूतें जिंकी जनपदहितप्रेरणा गे विशाला ॥
संबोधावें समविषम या त्वन्मनाच्या स्थितीला ।
रोषें ?-नोहे उचित परि तें स्थान त्या निष्ठुराला ॥

७८

किंवा वाटे सहज नियमें आज वर्षर्तु आला ।
पर्जन्याच्या घन विकिरिती थोर धारा धरेला ॥
वर्षाकाळीं बहुत जन, गे, होति नानाविकारी ।
लीले, आधीं कुशल कळवीं, वाटते भीति भारी ॥

७९

किंवा वाटे तुजसि रुचलें नाहिं नामाभिधान ।
ठेवी प्रेमें ‘ नव शशिकला; ’ कल्पनाभास गौण ॥
राहो सारें ! प्रियतम मला एक ‘लीलावती’ च ।
होई आतां मुदितहृदया; हास्ययुक्ता खरीच ॥

८०

किंवा वाटे झणिं परिसुनी आसुरी घोर वार्ता ।
ज्या ज्या मुंबापुरिंत घडती लक्षुनी राजदूतां ॥
न्यायान्याया पदिं तुडविती बालबालाबलांना ।
तें ऐकोनी जनक जननी कीं तुला पाठवीना ॥

८१

किंवा वाटे मजसिं चतुरे! ' सेविका ' देशकार्या ।
मोठें होसी प्रचलितमहायुद्धकांडामधें या ॥
स्वातंत्र्याचें फडकत बरें एक हातीं निशाण ।
देशी वस्त्रीं सहज दिससी दिव्यशोभायमान ॥

८२

किंवा वाटे झणिं उमजसी शिक्षणाच्या क्रमातें ।
जें बालांना विगतबल वा दासदासी करीतें ॥
त्यातें आतां उचित करणें एकदां राम राम ।
तेणें मुंबापुरिस मग या यावया काय काम ? ॥

८३

येसी केव्हां परत, सखये, सांग मुंबापुरीला ?।
ही मीनाची तळमळ पहा! चैन नाहीं मनाला ॥
' लीले ' ' लीले ' म्हणुनि मम हा कंठ गेला सुकोना ।
बाहे मेघा फिरुनि फिरुनी चातक श्रांत रानीं ॥

८४

सांगें आतां दिवस तरि हे कंवि कंठावयाचे ?।
आषाढाचे तुजविण तसे शुष्क या जीविताचे ॥
लीले, मातें कुशल तवही ना कळे आज कांहीं ।
जीवा-देहा विरह! मजला जाळिते कल्पना ही ॥

८५

तारायंत्रें कुशल पुसणें शीघ्र संदेशहारी ।
बाळे, तेंही अनुचित गमे, स्वीय चित्ता विचारीं ॥
रोषें सारे वदतिल तुला लोक गे दुर्विचारें ।
"लीले, आधीं प्रथम कथिं हें गौडबंगाल सारें ॥ "

८६

जावें आतां म्हणुनि उठलों सागराला पुसाया ।
मन्मित्राची बहुगुणवती मोरणा नाम जाया ॥
माहेरातें त्यजुनि परते आज मुंबापुरीला ।
तीतें ग्रामीं चतुर हरिणी भेटली खास लीला ॥

८७

हा ! हा ! कां हा बहुत दिसतो सिंधु रागावलेला ? ।
क्षुब्ध क्रोधें सुहृद मम हा अंतरीं, लाल झाला ॥
तद्भार्येला कठिण पुसणें वाटते क्षेमवार्ता ।
चित्तीं धीरा धरुनि तरिही पातलों येथ आतां ॥

८८

'कां बा मित्रा चतुर सखया, सागरा काय झालें ? ।
वर्षाकाळीं अवचित तुला क्रोध-वारें निराळें ! ॥
आली नाहीं हृदय-रमणी मोरणा अल्पकालें ।
येथें गेहीं म्हणुनि तव कां चित्त रागावलेलें ?॥

८९

मित्रें केलें मुकुल हृदयें स्वागताला मदीया ।
प्रेमें तीही विनयविनता भेटली मित्रजाया ॥
तीतें ठावें परि न दिसतें वृत्त लीलावतीचें ।
आतां सारें हितगुज कसें येथ बोलावयाचें ? ॥

९०

आह लीला मम कुशल का ? मोरणे, दीर्घकालें ।
नाहीं कांहीं कुशल कळलें, पाहिलें, कधिं आलें ! ॥
तूं येतांना तुजसि वदली वृत्त का काय सांगें ।
भेटीसाठीं सुगुणवतिच्या अंतरीं ध्यास लागे ॥

९१

" लीला मातें मुदित हृदयें भेटली मातृगेहीं ।
आहे तेथें कुशल करणें काळजी ती न कांहीं ॥
प्रेमी, माता सुजन जनक, क्षेम सारीं, खुशाल ।
ग्रामामाजीं चळवळ बरी चालते आजकाल ॥

९२

" लीला मोठी रसिक ! शिकली वाजवायासि वीणा ।
मातें तीनें मग शिकविलें ! हौस दोघी जणींना ॥
माता प्रेमें बहुत करिते तातही कौतुकाला ।
सर्वांना ती सहज सुखवी प्रेमला खास लीला ॥

९३

" केव्हां केव्हां निज नगरिंच्या बोलते ती सभेंत ।
केव्हां केव्हां अभिनव असें गातसे राष्ट्रगीत ॥
ग्रामामाजीं निज भगिनिंचे घेतले धन्यवाद ।
लीला मोठी चतुर, सुगुणाधार, नाहींच वाद ॥

९४

" येतो केव्हां ज्वर; म्हणुनियां बोलले वैद्य बोवा ।
'काढा घ्यावा अनलसपणें,' सांगुनी सात नांवा ॥
तेणें आली सहज वदनीं पांडुता थोडथोडी । "
हृद्रोगा ती कधिं न कळवी ! ही तिची एक खोडी " ॥

९५

लीलेचें हें गुज परिसुनी मैत्रिणीच्या मुखींचें।
चित्तीं माझ्या त्वरित ठरलें गुप्त बोलावयाचें॥
मित्रा, माझी प्रथम तुजला एक आहे विनंति।
कीं जाऊं दे पुनरपि घरीं मोरणेला प्रभातीं॥

९६

लागे माझ्या हृदयिं, सखया, काळजी फार फार।
तूत आहे अनुभव तसा, मी किती सांगणार?॥
या कार्याला त्वरित दिधला सागरानें रुकार।
सन्मित्रांचें हृदय जगतीं चीज ती एक और॥

९७

जाई आतां पुनरपि घरीं भेट लीलावतीला।
येतो किंवा ज्वर अजुनिही? घेत कीं औषधाला?॥
माझ तीतें कुशल कळवीं, घे समाचार सारा।
मैत्रीसाठीं खचित, सदये, या तुला येरजारा॥

९८

तेथें गेल्यावरि न कळतां अन्य कांहीं कुणाला।
चातुर्यानें सकळ बरवें कार्य ने पूर्ततेला॥
स्नानासाठीं बहुत जमती बालिका भव्य तीरीं।
एकांतीं तूं वद तिज असें, सर्व योग्य प्रकारीं॥

९९

किंवा येतां अवचित सखे, देवळामाजिं लीला।
प्रेमें घेई घडिभरि तिची भेट एकांत काला॥
आहे तेथें प्रबळ बसला मारुती ब्रह्मचारी।
पूजाया त्या सुमन-सुमनें येत ती मंदवारीं॥

१००

किंवा लोकीं तरुण-तरुणी पूजिती कोण देवा ।
सांगें त्यांचा मजसिं चतुरे, जो मनोभाव ठावा ॥
त्वत्तीरीं गे वसत दुसरें धाम तें शंकराचें ।
घेती ज्याचें मुनि अनुदिनीं, देवही नाम वाचे ॥

१०१

दाम्पत्याला भजति तरुणी पूज्य गौरीहराला ।
स्त्रीवर्गा कां, कळत न परी मारुती पूज्य झाला ॥ ?
सन्मानाया सकल जमती दंपतींच्या पदाला ।
लीला तेथें खचित मग ये पार्वतीमन्दिराला ॥

१०२

ही जाई म्हणुनि सहजीं, मोरणे, शंभुगेहीं ।
लीला येई तंव घडिभरीं बैसुनी वाट पाहीं ॥
तेथें खेळे निजपतिसवें सारिपाटा मृडानी ।
जाणें तेथें परि मज गमे, मोरणे, रंगहानि ॥

१०३

कीं एकांतीं रमण-रमणी कौतुकें खेळतांना ।
जाणें तेथें अनुचित गमे, कारणें त्यासि नाना ॥
येतो चित्तीं परिस चतुरे! एक आतां विचार ।
शंभु ज्ञानी जरठ! जरठां प्रीति ना दुर्निवार ॥

१०४

द्यूतामाजीं हर! हर। हरें सर्वही हारवीलें ।
धूर्ता मोठी हिमनगसुता, शम्भुला 'जीत' केलें ॥
गेला नंदीसहित डमरू, खड्ग कौपीन तेंही ।
नेसायाला त्रिभुवनभरा आज कांहींच नाहीं ॥

४६५४२१

१०५

साऱ्या विश्वा शिव, सुचतुरे, एक तो सर्वसाक्षी।
पत्नीपाशीं कलह करितां त्यास लागेल साक्षी ॥
ऐशा काळीं कधिं न पतिचा, पत्निचा पक्ष घ्यावा।
आहे ठावा तुजसि सगळ्या अंगनांचाचि कावा ॥

१०६

किंवा जातां कलह कळसा, इष्ट कांहीं समेट।
चातुर्यानें रुचिर घडवीं, बोलुनी नीट नीट ॥
दे कौपीन प्रथम, डमरू तोहि दे, कीं शिवाला।
विश्वीं साजे स्वकरिं डमरू! गारुडी तो जगाला! ॥

१०७

कालक्षेपा करिं न चतुरे! मोरणे नीघ आतां।
होतें जें जें उचित, कथिलें सर्वही नीट जातां ॥
ये घेवोनी जरि तुजसवें वाटलें इष्ट लीले।
तें लीलेचें चतुरपण ये जाण वाखाणलेलें ॥

१०८

आला चित्तीं सहज दुसरा एक आतां विचार।
एकापाठीं विधुस दुसरा झांकितो मेघ थोर ॥
सन्मित्राचें सुजनपण वा मोरणेचें बघुनी।
एकाएकीं मम हृदयिंचा बेत गेला फिरोनी ॥

१०९

मित्रा, वाटे उचित मजला मी स्वयें तेथ जावें।
प्रेमें लीलावतिस चतुरा दीर्घकालें पहावें॥
या कार्याला अनुमति मिळे आज दोघां जणांची।
सन्मित्राच्या हृदयिं सुजना, संमतीतेंचि याची ॥

११०

जाया आतां दिन ठरविला सोमवारीं तृतीया ।
प्रेमाशेचे किरण सगळे आजि सूर्योदया या ॥
ध्यातों चित्तीं मदन-दहना त्या अपर्णाप्रियाला ।
आशीर्वादा जनकजननीवन्दनें तोष झाला ॥

१११

मार्गीं टाकीं हळुहळुच हीं पावलें मंद साचीं ।
आली गाडी जलद गतिची, शक्ति सौदामिनीची ॥
आनंदानें हळुच चढलों मी, विचारांत चूर ।
'जाणें कोठें' म्हणुनि पुसतां बोललों नागपूर ॥

११२

हास्यार्थानें जन परि मला सूचितार्थासि दावी ।
चित्तीं तत्कालचि उमजलों ! चूक तैशी न व्हावी ॥
आलों आतां झणिं 'बदरिका' बन्दर स्टेशनाला ।
इष्टस्थाना बघुनि बसलों आगगाडी विशाला ॥

११३

धांवे वेगें पवनगतिनें वाटतें आगगाडी ।
माझी तैशी अविरत तिची धांवण्याची धडाडी ॥
ग्रामीं आलों प्रिय युवतिच्या ! जाहली मध्यरात्र ! ।
ऐशा काळीं दिसत न कुणी ! मार्ग तो एक मित्र ॥

११४

वाटे पुण्य-प्रभव नव हें ग्राम लीलावतीचें ।
येथें माझें हृदय हरिलें तेंचि शोधावयाचें ॥
'लीला' 'लीला' जपचि धरिला ध्यास तो गे जिवास ।
विश्वात्मा तो प्रणव शिव ! तन्मंदिरामाजिं वास ॥

११५

सांबाआधीं प्रथम नमिला जोडुनी हात नंदी ।
राजद्वारीं सकल जनही द्वारपाळासि वंदी ॥
तो थोरांचा सुगुणमहिमा ! त्यांचिया संगतीनें ।
क्षुद्रातेंही मिळत जगतीं मान नेमक्रमानें ! ॥

११६

आली लीला मम सुखकरी एकदा या जगींची ।
माझी आशा खचित पुरली, भेट झाली जिवाची ॥
ऐसा आतां क्षण न जगतीं या जिवा प्राप्त व्हावा ! ।
हा संकत प्रकट हृदयीं दोन जीवीं धरावा ! ॥

११७

पांडुत्वानें वदन सुकल ! काय झाली दशा ही ! ।
लीले ! लीले ! मृदुल तनुही वाळली काय पाहीं ॥
बोले कांहीं नच, खळखळां अश्रुचा पूर लोटे ।
माझ्या नेत्रीं लव न कमती चाललें नीर नेटें ॥

११८

आतां, लीले, प्रकट दिधलें, स्तब्ध आलिंगनाला ।
भावार्थातें हृदयिं धरिलें ! दुःख गेलें लयाला ॥
लीले, राहें अवनितलिं या ! राहिं कोठें तरी गे ।
मी जन्माचा फकिर समजें, जाहलों गे विरागें ॥

११९

स्वर्गांमाजीं पुढतिं ठरली भेट आतां तुझी गे ।
माझा सर्वां जनपदपदा हा नमस्कार सांगें ॥
लीले, सोडीं, शपथ तुजला, सोडिं आतां मला गे ।
गेहीं जाईं, हृदयिं जपिं गे शंकरा सानुरागें ॥

१२०

प्रेमें अंतीं उठवुनि करें मुग्ध लीलावतीला।
आशीर्वादा शिवहि नमिला, जीव माझा निमाला॥
" अल्लख् अल्लख् " करित फिरतों मी वऱ्हाडीं फकीर।
नित्यानंदीं हृदय भरलें स्वैर वा बेफिकीर॥

१२१

काव्योद्यानीं कविहृदयिं ये प्रेमवृक्षा बहार।
पुष्पें त्याचीं खुडुनि बनवीं हा तयांचाचि हार॥
लीले, आतां द्विगुणिं नव हा हार घालीं गळ्यांत।
माधुर्यानें खुलवि, खुलतो कंठ तो शोभिवंत॥

समाप्त.

REFBK-0004515
REFBK-0004515
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सा. क्र. ४५९५